नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 17/10/2020 (शनिवार)
(सकाळ)

---

## चोरी

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 22 किमी अंतरावर मौजा सुरगाव येथे दिनांक 05/10/2020 चे 09.30 वा. ते दिनांक 12/10/2020 चे 18.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. कल्याणी महेश बोरीकर, वय 26 वर्ष, रा. सुरगांव ता. उमरेड यांच्या घरी आरोपी नामे– 1) सौ. किरण खुशाल टागले व 2) खुशाल टागले, रा. दोन्ही भिलगांव ता. कामठी. जि. नागपुर हे दोघेही काविळ या आजाराचे उपचाराकरीता आले होते. आरोपीतांना फिर्यादीच्या घरातील सोने ठेवण्याचे ठिकाण माहीत असल्याने व घरी कुणीही हजर नसल्याचा गैरफायदा घेवून आरोपीतांनी कपाटामधील सोने अंदाजे 03 तोळे किंमत 1,18,456/– रू. संगनमत करून चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 380, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि भारत थीटे 9623857068 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. केळवद :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील मौजा परसोडी येथे दिनांक 15/10/2020 चे 20:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– गौरव राधेशाम धुर्वे, वय 30 वर्ष, रा. परसोडी ता सावनेर यांचे वडिल नामे– राधेशाम लखन धुर्वे, वय 50 वर्ष हे आपले एम.एच–40/बी.झेड– 2415 क्रमांकाच्या मोटरसायकलने खुरजगाव वरुन परसोडी येथे परत येत होते. त्यादरम्यान कबीर पेट्रोल पंप समोर सावनेर सौंसर रोड वर छिंदवाडा कडुन भरधाव वेगाने निष्काळजीपणे येण्याऱ्या अज्ञात वाहन चालक आरोपीने फिर्यादीचे वडीलाचे वाहनाला जोरदार समोरुन धडक दिली. या अपघातात राधेशाम धुर्वे हे जखमी झाले. त्यांना उपचाराकामी ग्रामीण रुग्णालय सावनेर येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री राठोड 8605585606 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापा :– अंतर्गत 08 कि. मी. अंतरावर मौजा कोदेगाव येथे दिनांक 16/10/2020 चे 18.00 वा. सुमारास मृतक/आरोपी नामे– अमित संजय शिंदे, वय 30 वर्ष, रा. कोदामेंढी हा त्याच्या एमएच–40/बीझेड – 1585 क्रमांकाच्या स्प्लेंडर मोटरसायकल वर डबल सिट जखमी नामे– संजय हेडाउ याला घेउन सावनेर वरून खापा गावाकडे भरधाव वेगाने जात असता त्यांची मोटरसायकल अचानकपणे स्लिप झाल्याने गाडीवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने ते दोघेही खाली पडले. या अपघातात आरोपी चालक– अमित शिंदे हा स्वतःचे मरणास व मागे बसलेला संजय हेडाउ याचे गंभीर जखमी होण्यास तो कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– लक्ष्मण नदेवाजी राउत, वय 45 वर्ष, रा. कोदेगाव यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपी विरुध्द कलम 279, 337, 304(अ) भादंवि. सहकलम 184 मोवाका अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. झांबरे 9028748409 हे करीत आहे.

## फसवणुक

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावर बॅचरल होस्टल बी रुम नं 37 एनटीपीसी मौदा येथे दिनांक 16/10/2020 चे 12.00 वा. पर्यंत फिर्यादी नामे– सत्यप्रकाश बारकेलाल शर्मा, वय 60 वर्ष, रा. बॅचरल होस्टल बी रुम नं 37, एनटीपीसी मौदा यांनी रीलायन्स डीजीटल ऑनलाईन शॉपीग येथुन आय फोन से 64 जीबी कि 39,699/– रु बुक केला होता. त्याच दिवशी स्टेट बॅक ऑफ इंडीया मौदा खात्यावरुन नेट बॅकीगने पेमेंट केला होता. दि 16/10/2020 चे सकाळी 12.00 वा दरम्यान कुरीयर बॉय ने पार्सल दिला व पार्सल दिल्यानंतर फिर्यादीने पार्सल उघडुन पाहीले असता त्यामध्ये हेडफोन, चार्जर, मोबाईल खरेदी केल्याचे बील व बीलावर आयएमईआय नं 356778111335510 असे नोंद होते. परंतु त्यामध्ये 64 जीबी सेल फोन नव्हते अश्याप्रकारे फिर्यादीची सदर रीलायन्स कंपनीकडुन फसवणुक झाली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी विरुध्द कलम 420 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. कुथे 9764007720 हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. खापा – दिनांक 16/10/2020 चे 12.00 वा. चे सुमारास पो.स्टे. खापा हद्यीतील फिर्यादी यांची 16 वर्षीय मुलगी हिला संशयीत आरोपी नामे– नितीन, रा. मध्यप्रदेश याने तिचे अज्ञानपणाचा फायदा घेत तिला फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री झाबंरे 9028748409 करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर